Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी,
आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Email : secretary.stateboard@gmail.com Telegram : MAHABOSEC, PUNE.
Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Secretary(P) : 25651750

परीक्षा /महत्वाचे

क्र.रा.मं./परीक्षा-२/१८५५
पुणे-४११००४
दिनांक-२०/४/२०२१

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:-एप्रिल-मे २०२१ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२ वी) परीक्षेच्या प्रात्यक्षिक व तत्सम परीक्षेच्या कार्यपध्दतीबाबत.
संदर्भ:-क्र.रा.मं/परीक्षा-२/१७४४ दिनांक ७/४/२०२१

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी आरोग्य शारीरिक शिक्षण या विषयासाठी तयार करण्यात आलेली लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा कार्यपध्दती संदर्भांकित पत्रान्वये पाठविण्यात आलेली आहे.

परंतु उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी आरोग्य शारीरिक शिक्षण या विषयाच्या **लेखी व प्रात्यक्षिक कार्यपध्दती च्या मूल्यांकन पध्दत मध्ये प्रचलित अभ्यासक्रम २०१३ वर आधारित ऐवजी नवीन अभ्यासक्रमावर आधारित** अशी दुरुस्ती करण्यात आल्याने नवीन तक्ता या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे.

तरी उच्च माध्यमिक परीक्षेसाठी तयार करण्यात आलेली आरोग्य आणि शारीरिक शिक्षण या प्रात्यक्षिक परीक्षा कार्यपध्दती विभागीय मंडळ स्तरावरून आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व शाळा, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना निदर्शनास आणून देण्यात यावी.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ,पुणे-४.

क्र.कोविमं/माध्य/उ.मा/गोप./ १८८
दिनांक: २२/०४/२०२१

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
मान्यता प्राप्त सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर

उपरोक्त पत्र सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्याची उचित कार्यवाही करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा एप्रिल- मे २०२१**

**आरोग्य व शारीरिक शिक्षण विषय लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा कार्य**

**या विषयाची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा नवीन मूल्यमापन आराखडयानुसार होईल.**

सदर विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा व लेखी परीक्षा मूल्यांकन इ. घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांना राहिल. त्यामुळे सदर परीक्षेचे दिनांक १०/०६/२०२१ पर्यत कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर आयोजन करुन त्याचे मूल्यांकन विभागीय मंडळाकडे सादर करावे.

| नियमित मूल्यांकन पध्दत | एप्रिल -मे २०२१ साठी मूल्यांकन पध्दत |
|---|---|
| लेखी परीक्षा = २५ गुण(द्विवतीय सत्रात अनिवार्य ) | लेखी परीक्षा = २५ गुण(द्विवतीय सत्रात अनिवार्य ) नवीन अभ्यासक्रमावर आधारित |
| प्रात्यक्षिक परीक्षा = २५ गुण<br><br>प्रात्यक्षिक १.आरोग्याधिष्ठित शारिरीक क्षमतेवर आधारित कोणतीही एक क्षमता(गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक २. कौशल्याधिष्ठित शारिरीक क्षमतेवर आधारित कोणतीही एक क्षमता (गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक ३. उपलब्ध असलेल्या सांघिक खेळापैकी एका खेळाची निवड करुन क्रीडा कौशल्य सादरीकरण घेणे. (गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक ४. योग व प्राणायम (गुण ५)<br>दोन आसने (प्रत्येकी २ गुण)<br>प्राणायम -(१ गुण)<br><br>५. विविध क्रीडा स्पर्धेतील सहभाग /तासिका उपस्थिती /पुस्तक लेखन कार्य (गुण ५) | प्रात्यक्षिक परीक्षा = २५ गुण<br><br>प्रात्यक्षिक १.आरोग्याधिष्ठित शारिरीक क्षमतेवर आधारित कोणतीही एक क्षमता(गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक २. कौशल्याधिष्ठित शारिरीक क्षमतेवर आधारित कोणतीही एक क्षमता (गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक ३. विद्यार्थी पारंगत असलेल्या खेळाची अथवा उपलब्ध असलेल्या सांघिक खेळापैकी एका खेळाची निवड करुन क्रीडा कौशल्य सादरीकरण घेणे. (गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक ४. योग व प्राणायम (गुण ५)<br>दोन आसने (प्रत्येकी २ गुण)<br>प्राणायम -(१ गुण)<br><br>५. विविध क्रीडा स्पर्धेतील सहभाग /तासिका उपस्थिती /पुस्तक लेखन कार्य (गुण ५) |

लेखी परीक्षा २५ गुण + प्रात्यक्षिक परीक्षा २५ गुण असे एकूण ५० गुणांपैकी मिळालेल्या गुणांचे श्रेणीत रुपांतर करण्यात यावे.

**मार्गदर्शक सूचना** – कमीत कमी विद्यार्थ्यांच्या बॅचेस करुन शारीरिक अंतर ठेवून गटागटाने प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात याव्यात. कॅामन साहित्याचा वापर टाळून वैयक्तिक स्वरुपाच्या क्षमता प्रात्यक्षिके घेण्यात यावीत. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लागणारे शक्य होईल ते साहित्य विद्यार्थ्यांनी स्वतः आणण्याचा प्रयत्न करावा. उदा. स्किपिंग रोप, योगा मॅट/सतरंजी इ.